दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक १७ • Title - Code :- MAHMAR4951 • बुधवार दि.०४ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# नांदेडच्या शिवसेना खासदार हेमंत पाटील यांनी डीनकडून करुन घेतले शौचालय साफ

## २४ तासात २४ मृत्यूनंतर नांदेडमधील दुरवस्था चव्हाट्यावर

**नांदेड | प्रतिनिधी**

नांदेडच्या शासकीय रुग्णालयात २४ तासांत २४ मृत्यू झाल्यामुळे अवघ्या राज्यात खळबळ माजली आहे. या प्रकरणी राज्य सरकारवर चौफेर टीका होत आहे. त्यात आता सत्ताधारी शिवसेनेचे खासदार हेमंत पाटील यांनी शासकीय रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांकडून (डीन) चक्क शौचालय साफ करवून घेतल्याची बाब उजेडात आली आहे. पाटील यांनी या प्रकरणी रुग्णालय प्रशासनाला धारेवर धरत रुग्णालयातील दुरवस्था चव्हाट्यावर आणली आहे.नांदेड शासकीय रुग्णालयात सोमवारी मागील २४ तासांत २४ मृत्यू झाल्याची बाब उजेडात आली होती. त्यात आणखी ७ मृतांची भर पडल्यामुळे बळींचा आकडा ३१ वर पोहोचला आहे. या घटनेचे राज्याच्या वर्तुळात तीव्र पडसाद उमटल्यानंतर सत्ताधारी शिवसेनेचे खासदार हेमंत पाटील यांनी शासकीय रुग्णालयाला भेट दिली. त्यानंतर त्यांना तिथे सर्वत्र घाणीचे साम्राज्य दिसेल. हे पाहून हेमंत पाटील हे चांगलेच संतापले. त्यांनी चक्क रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना (डीन) शौचालय साफ करायला लावले. इतकेच नाही तर त्यांनी यावेळी रुग्णालय प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.नांदेडच्या शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय आणि रुग्णालयांमध्ये २४ तासांमध्ये २४ रुग्णांचा आणि त्यानंतरच्या २४ तासात सात रुग्णांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यातील राजकारण तापले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे खासदार हेमंत पाटील यांनी आज या रुग्णालयात येऊन परिस्थितीची पाहणी केली. यात त्यांना रुग्णालयात सर्वत्र घाणीचे साम्राज्य दिसून आले. रुग्णालयातील स्वच्छतागृह अतिशय घाणेरड्या स्थितीत होते. अनेक शौचालय ब्लॉक होते. काही ठिकाणी तर स्वच्छतागृहात देखील सामान ठेवलेले होते. त्यामुळे हेमंत पाटील चांगलेच संतापले. त्यांनी चक्क रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना स्वच्छतागृह साफ करायला लावले.रुग्णालयात सर्व अनागोंदी कारभार सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणातील दोषींवर सदोष मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याची माहिती या वेळी खासदार हेमंत पाटील यांनी दिली. रुग्णालयात सर्वत्र घाणीचे साम्राज्य आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. यातच औषधाचा देखील तुटवडा निर्माण झाला आहे. रुग्णालय प्रशासनातील दोषी अधिकाऱ्यांवर आणि डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी खासदार हेमंत पाटील यांनी केली.



# विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धेत डॉ.आंबेडकर महाविद्यालयचे सुयश

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र तथा आंबेडकरी आंदोलनाचे अग्रणी नेते, राज्यसभेचे उपसभापती स्मृतिशेष बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांच्या ९८ व्या जयंती निमित्त्याने डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दीक्षाभूमी, चंद्रपूर येथे दिनांक २५ सप्टेंबर २०२३ रोजी जयंती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त्य चंद्रपूर शहरात मध्यभागी स्थित स्मृतिशेष बॅरी. राजाभाऊ खोबरागडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोअसायटीचे अध्यक्ष अरुण घोटेकर यांनी अभिवादन केले. याप्रसंगी उपाध्यक्ष मारोतराव खोबरागडे, अशोक घोटेकर, सचिव वामन मोडक, सहसचिव कुणाल घोटेकर, सदस्य ऍड. राहुल घोटेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश दहेगांवकर, उपप्राचार्य डॉ. संजय बेले व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यानंतर जयंती समारंभाचा कार्यक्रम महाविद्यालयातील डॉ. आंबेडकर भवन येथे पार पडला. आपल्या अध्यक्षीय भाषणातून अरुण घोटेकर यांनी स्मृ. राजाभाऊ खोबरागडे यांच्या आंबेडकरी आंदोलनातील योगदानाविषयी व स्मृ. राजाभाऊ खोबरागडे यांनी चंद्रपूर सारख्या मागासलेल्या जिल्ह्यात दलित, शोषित, वंचित बहुजन समाजासाठी शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून १९७० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोअसायटीची स्थापना केली तेव्हापासून संस्था व महाविद्यालय उत्तरोत्तर प्रगतीपथावर आहे असे सांगितले.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. संजय बेले यांनी केले आणि प्रमुख मार्गदर्शक प्रा. जगदीश चिमुरकर यांनी बॅरी. राजाभाऊ खोबरागडे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मिलिंद भगत यांनी केले तर प्रा. सतीश पेटकर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.स्मृतिशेष बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांच्या ९८ व्या जयंती निमित्त्याने सकाळी ११:०० वाजता लोकप्रतिनिधींचे पक्षांतर लोकशाहीला आव्हान देत आहे या विषयावर विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर वादविवाद स्पर्धेकरिता विदर्भातील विविध महाविद्यालयातील स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले. या स्पर्धेत डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपूर चा अविनाश रामटेके प्रथम, आकाश कडुकर,सर्वोदय महाविद्यालय, गोंडपिपरी, द्वितीय तर कु. सिद्धी अलोणे , शरयू महिला महाविद्यालय,मूल तृतीय क्रमांकाने विजयी ठरले. फिरते सांघिक चषकाचे मानकरी डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर ठरले. विजेत्यांना पुरस्कार रक्कम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांनी त्यांना सन्मानित केले. सदर स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. टी. डी. कोसे, डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर, प्रा. विठ्ठल चौधरी, चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा, मान. बळीराज निकोडे, तालुका कृषी अधिकारी, गोंडपिपरी यांनी परीक्षण केले.



# सोयाबीनवर रोगाचा प्रादुर्भाव तातडीने पिकांचे पंचनामे करा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश


**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यातील ९ जिल्ह्यांमध्ये सोयाबीनच्या पिकावर पिवळा मोझेक हा विषाणूजन्य रोग आणि खोडकूज, मूळकूज या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून कृषी विभाग आणि मदत व पुनर्वसन विभागांनी संयुक्तपणे तातडीने सोयाबीन पिकांचे पंचनामे सुरू करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत दिले.

पावसाचा मोठा खंड आणि सप्टेंबरमध्ये झालेला पाऊस, तापमानात बदल तसेच इतर काही कारणांमुळे सोयाबीनवर या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. विशेषत: चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, सोलापूर, लातूर, वाशिम, नांदेड, वर्धा या जिल्ह्यांत हा प्रादुर्भाव दिसत असल्याने सोयाबीनचे पीक पिवळे पडत चालले आहे.नुकसान झालेल्या क्षेत्रामध्ये विमा संरक्षित क्षेत्राचा अंतर्भाव असल्यामुळे विम्याची मदत वेळेत करणे शक्य व्हावे आणि त्यांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळावा म्हणून प्राधान्याने हे पंचनामे करावेत, असे निर्देश देण्यात आले.



# राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



**चंद्रपूर**–२ ऑक्टोबर २०२३ राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती जनता विद्यालय ताडाळी येथे उत्साहात साजरी झाली, कार्यक्रमाला जनता विद्यालय ताडाळीचे मुख्याध्यापक भास्करराव गजानन जीवतोडे उपस्थित होते , प्रमुख पाहुणे कु. ए .एस. बुच्चे उपस्थित होत्या,तसेच सर्व शिक्षक ,शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी ,कॉन्व्हेंटच्या शिक्षीका व बरेच विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी राबविले किनाऱ्यावर प्लास्टिक मुक्ती अभियान

**वर्धा | प्रतिनिधी**

महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती च्या पर्वावर विकासार्थ विद्यार्थी ( स्टुडंट्स फॉर डेव्हलपमेंट - एस एफ डी ) च्या वर्धा नगर शाखेच्या वतीने सुकळी बाई येथील नदी किनाऱ्यावर प्लास्टिक मुक्ती अभियान राबवून किनाऱ्यावरील प्लास्टिक जमा करत स्वच्छता करण्यात आली. या दरम्यान विकासार्थ गतिविधी चे विदर्भ प्रदेश सह-संयोजक साहिल इंगळे सुद्धा उपस्थित होते. महात्मा गांधी जयंती निमित्त विकासार्थ विद्यार्थी(एस एफ डी ) द्वारे विकास चेतना सप्ताह राबविण्यायेत आहे या मार्फत पर्यावरण स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्तता करण्याचा संकल्प विकासार्थ विद्यार्थी गतिविधी (एस एफ डी )कडून करण्यात आला आहे.

पर्यावरणातील जल-जंगल-जमीन-जन-जानवर या पाच घटकांचे संवर्धन करण्यात हेतूने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन एस एफ डी मार्फत करण्यात येत आहे. आगामी काळात शहरातील विविध स्थळ तसेच प्रत्येक महाविद्यालय परिसर स्वच्छ आणि प्लास्टिक मुक्त करण्याचा प्रयत्न विकासार्थ विद्यार्थी (एस एफ डी ) करणार असल्याने पर्यावरण संवर्धनाकरिता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी एस एफ डी च्या उपक्रमात सहभागी व्हावे आणि आपला महाविद्यालय परिसर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी एस एफ डी ला मदत करावी असे आवाहन एस एफ डी चे प्रदेश सह संयोजक साहिल इंगळे यांनी केले. यावेळी अभाविप वर्धा जिल्हा संयोजक वैभव राऊत तसेच देवयानी पांडे ,तन्वी कुचेवार ,वैदेही पांडे ,शिवम काळे ,मंथन नलगे ,मृणाल नेटके ,अजिंक्य देव ,तुषार काथवटे , अभिषेक देवर उपस्थित होते.



# शब्द वेध

### श्रध्दा !

एवढेसे काम केले कुणी तर
आपण त्यांचे आभार मानतो..
अगदी रुमाल उचलून दिला तरी
ताबडतोब धन्यवाद म्हणतो !

माता पित्यांचेही असेच असते
पितृ पक्षातील स्मरण त्यांचे...
जगण्याला बळ देत असते.



सुभाष उसेवार
९०११२६२४३९

# भद्रावती पोलिसांची दडपशाही;कर्नाटक एम्टा कंपनीतील कामगाराचा दुर्दैवी मृत्यू

## मृत कामगाराच्या न्यायासाठी लढणाऱ्या शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुखाला बळजबरीने अटक

**भद्रावती | प्रतिनिधी**

तालुक्यातील कर्नाटक एम्टा कंपनीतील केपीसीएल याठिकाणी काम करणाऱ्या एका कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाला.कंपनी प्रशासनातर्फे सदर मृत कामगाराला आर्थिक मदत देण्याची मागणी केल्या जात होती मात्र मुजोर कंपनी प्रशासनाने मागणी मान्य न केल्याने मृत कामगारांच्या कुटुंबीयांनी शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्याशी संपर्क केला असता जिल्हाप्रमुख यांनी आक्रमक भूमिका घेत कंपनी प्रशासनाला जाब विचारला व मृत कामगाराच्या कुटुंबीयांना २० लाख रुपये मदत देण्याची मागणी केली होती. त्यामुळे भद्रावती पोलीस प्रशासनाने शिवसेना जिल्हाप्रमुख यांना बळजबरीने अटक केल्याने भद्रावती पोलिसांची दडपशाही समोर आली आहे.

भद्रावती येथील कर्नाटक एम्टा कंपनीतील केपीसीएल येथे काम करणाऱ्या जितेंद्र रामअवतार कर्णधार वय ३६ वर्ष राहणार महाकाली कॉलारी, चंद्रपूर या कामगाराचा दिनांक २ ऑक्टोंबर रोजी ह्रदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला. कंपनी प्रशासनातर्फे सदर कामगाराचा इपीएफ तसेच एएसआयसी भरण्यात आला नाही. तसेच कंपनी प्रशासनातर्फे मृत कामगाराला कुठलीही आर्थिक मदत देण्यात टाळाटाळ करत असल्याने मृत कुटुंबियांच्या परिवारानी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्याशी संपर्क केला असता त्वरित ग्रामीण रुग्णालय भद्रावती गाठत. सदर मृत कामगाराचा इपीएफ तसेच इएसआयसी का भरला नाही? याबाबत जाब विचारला तसेच मृत कामगारांच्या कुटुंबीयांना २० लाख रुपये मदत देण्याची मागणी केली होती. मात्र कंपनी प्रशासनाने पोलीस प्रशासनाला सोबत घेऊन पळता पाय काढला. त्यामुळे मृत कामगारांच्या कुटुंबीयांचा रोष वाढण्याने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्यासह शेकडो शिवसैनिकांनी मृत कामगाराला न्याय मिळवून देण्यासाठी कंपनीकडे धाव घेतली मात्र पोलीस प्रशासनाने दडपशाही दाखवत त्यांना अटक केली. व कलम ३२४ अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यामुळे पोलिस प्रशासनाच्या भूमिकेवर मृत कामगारांच्या कुटुंबीयांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. त्यामुळे पोलिस प्रशासन मृत कामगाराला न्याय मिळवून देण्यासाठी कितपत तत्पर राहील की झाकली मूठ साव्वा लाखाची म्हणून कंपनी प्रशासनाला पाठीशी घालेल हे बघणे आता औचित्याच्या ठरणार आहे.



# नाभिक समाज परिवर्तनाकडे

अनिलकुमार मल्लेलवार, पुणे,९५६१०८४०९१

समाजाचे सर्वांगीण परिवर्तन हवे असेल तर सर्वांगीण विकास साधण्यासाठी कोणत्या मुख्य अंगांचा विचार होणे आवश्यक आहे हे ठरवायला पाहिजे. एकदा हे सुनिश्चित झाले की आपणास योग्य दिशा मिळेल व या दिशेने वाटचाल करण्यासाठी कोणकोणते मार्ग आपणास चोखाळले पाहिजेत हे बघणे व त्याची अंमलबजावणी करणे सोपे जाईल.
शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे असे म्हणतात. शिक्षणाने सामाजिक स्तर सुधारण्यास मदत होते. शिक्षणामुळे, ज्ञानामुळे सामाजिक उतरंड बाजूला सारून समाज तुमचा स्वीकार करायला लागतो व समाजाची सध्या जी उपेक्षा होत आहे किंवा टवाळी, अपमानास्पद वागणूक मिळते ते कमी होईल असे वाटते. त्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या समाजाचा सहभाग वाढला पाहिजे. म्हणजे आपल्या समाजातील मुलामुलींना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे किंवा दिले पाहिजे. हे होण्यासाठी आपल्या समाजातील धनाड्यांनी शैक्षणिक संस्था उभ्या केल्या पाहिजेत जेथे आपल्या समाजातील मुलांना प्राधान्य, फी मधे सवलत, राहण्याची व्यवस्था अशा गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे म्हणजे दहावीच्या आतच गळती किंवा दहावी नंतर आर्थिक परिस्थिती मुळे शिक्षण सोडावे लागण्याचे प्रमाण कमी करता येईल. तसेच स्पर्धा परिक्षेत उतरण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या समाजातील लोक जर यात कार्यरत असतील(आणि आहेतही) तर त्यांचा या कार्यासाठी उपयोग करून घेता येईल. सध्या सरकारी नोक-यांचे प्रमाण कमी झाले आहे. स्पर्धा परिक्षेत जागा खूप कमी व परिक्षेत बसणारे हजारो/लाखो असल्याने पदरी अपयश पडण्याची शक्यता अधिक असते त्यातून नैराश्य येऊन आत्महत्येस प्रवृत्त होण्याइतकी टोकाची पावले मुले मुली उचलतात व आईवडिलांना दुःखाच्या खाईत लोटतात. त्यामुळे स्वतंत्र व्यवसाय कसा सुरू करता येईल याकडेही पहावे लागेल. पारंपारिक व्यवसायाला आधुनिकतेची जोड देणे आवश्यक आहे. नाहीतर आपण या धंद्याबाहेर फेकले जाऊ. इतर जातीतील लोक आपल्या धंद्यात घुसले आहेत त्यांच्याशी स्पर्धा करता आली पाहिजे. यापुढे जाऊन पर्यायी जोड धंद्याचे कसब आत्मसात करावे लागेल. आपणास सद्य परिस्थितीमध्ये नवनवीन व्यवसाच्या संधीकडे पाहता आले पाहिजे. त्यासाठी अल्प मुदतीचे कोर्सेस करण्याची तयारी पाहिजे.
दुसरा मार्ग म्हणजे आपल्या पारंपरिक नाभिक व्यवसायाचे आधुनिकीकरण करून त्याला वैयक्तिक आरोग्य सेवा, स्वच्छतेची जोड देऊन, समाजमान्य व्यवसायाचा दर्जा प्राप्त कसा प्राप्त होईल हे पहावे लागेल. कोविडमुळे ही गरज थोड्याच प्रमाणात पूर्ण होऊ शकली आहे. आणि आता मोठे उद्योजक या क्षेत्रात उतरून आधुनिक सलून ची भारतभर साखळी निर्माण करण्यासाठी पाऊले उचलत आहेत. हे आपल्या पारंपारिक व्यवसायावरील संकट नसून त्याकडे संधी म्हणून पहावे लागेल. जसे बँकिंग उद्योगामध्ये टेक्नॉलॉजीमुळे आमुलाग्र बदल झाले आहेत तसा बदल आपल्या पारंपारिक व्यवसायात नव्हे उद्योगात होण्याची ही सुवर्ण संधी आहे. असे जर झाले तर आपला आर्थिक दर्जा व राहणीमान सुधारेल व सामाजिक मान्यता मिळण्याची शक्यता वाढेल व आपल्याकडे बघण्याची दृष्टी बदलेल. अपमानास्पद वागणूक देणे, जातीवरून चेष्टामस्करी करणे, उपहासात्मक टीकाटिप्पणी करणे बंद होईल. एकीकडे शैक्षणिक दर्जा व योग्यता सुधारेल चांगली पदे मिळणे सोपे होईल, दुसरीकडे पारंपारिक नाभिक व्यवसायामध्ये आधुनिकतेची कास धरल्याने आर्थिक उन्नती होईल व त्यामुळे ही वाकड्या नजरेने बघणे बंद होईल. अशा त-हेने समाजाचा सर्वांगीण विकास होण्याची प्रक्रिया सुरू होईल. आर्थिक पाठबळ उभे करण्यासाठी सरकारवर अवलंबून न राहता मारवाडी व्यापारी किंवा उडपी हॉटेल वाल्यांच्या सारखे संघटन हवे त्यातून एकमेका सहाय्य करू, अवघे धरु सुपंथ हे साध्य होईल. हे होत असताना आपल्या समाजातील लोकांचा राजकीय सहभाग वाढायला पाहिजे. अधिकाधिक प्रतिनिधित्व गाव, तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर मिळण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी आपल्या समाजातील एकीची भावना वाढीस लागली पाहिजे.
एकीचे बळ ओळखून पावले उचलली पाहिजेत. सध्या आपण आपल्यातील दुफळीचे बळी आहोत. आपण दुस-यासाठी राबण्यात धन्यता मानतो. आपण आपल्या समाजाचा इतिहास विसरलो आहोत. तो आपल्या रोजच्या जीवनात ठणकावून सांगता आला पाहिजे. आपल्यातील हीनतेची भावना काढून टाकली पाहिजे.आपल्यातील नेतृत्व गुणांचा वारसा आपण विसरून आपण दुस-यांच्या दावणीला बांधून घेण्यात धन्यता मानणे श्रेयस्कर समजून फार मोठी चूक करत आहोत. आपल्यातले वकील प्रबोधनाचे कार्य करू शकतात. घटनात्मक तरतुदींची जाणीव करून देणे, ओबीसी साठी असलेल्या तरतूदी विशेषतः घटनेतील ३४० कलम विषयी जागरुकता निर्माण करून त्याच्या अंमलबजावणीसाठी पाठपुरावा करणे यासाठी राजकीय शक्ती उभी करणे या गोष्टीकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.
राजकीय शक्ती उभी करण्यासाठी सामाजिक उत्थान होणे आवश्यक आहे. त्यासाठी अनिष्ट चालीरीतींना तिलांजली दिली पाहिजे. अनावश्यक खर्चाच्या खाईत लोटणा-या परंपरांचा त्याग केला पाहिजे. रोटीबेटी व्यवहारातील भेदाभेद अमंगळ ठरवून त्याचा त्याग केला पाहिजे व इतर लोक आपणास नीच दर्जाचे समजत असताना आपल्यातच आपण उच्च नीच भावनेचा त्याग करून सोशल इंजीनियरिंग व रि- इंजिनियरिंगचा पुरस्कार केला पाहिजे. पदर जुळत नाही किंवा देवक वेगळे आहे अशा गोष्टी दूर ठेऊन चांगल्या संबंधाचे स्वागत करावयास पाहिजे तरच एक सुशिक्षित, सशक्त व इतर समाजावर प्रभाव पाडणारी, नेतृत्वगुणसंपन्न पिढी तयार होईल. यासाठी सांस्कृतिक देवाणघेवाण होणे आवश्यक आहे. यामधे सध्या कार्यरत असलेली विविध सामाजिक संस्था व विवाह मंडळानी एकत्र येऊन या कार्यास एक चांगली दिशा देऊन समाजाचे प्रश्न सोडवून प्रगती साधता येईल.
समाजाचे संघटन कसे असावे? सध्या चित्र विचित्र आहे. एकाच नावाच्या अनेक संस्था आहेत. स्थानिक नेतृत्वाला डावलले जाईल ही भिती निराधार आहे. आपले कार्य निरपेक्ष समाजहितैषी असेल तर आपली समाज मनावरील पकड कुठल्याही परिस्थितीत घट्ट राहील. संघटन हे पारदर्शक, सर्वसमावेशक, निष्कलंक चारित्र्य असणा-या व्यक्तींच्या हातात असावयास पाहिजे नाहीतर चांगले लोक समाज कार्याकडे आकृष्ट होणार नाहीत. राज्य स्तरावर एकच शिखर संघटना असावयास पाहिजे व गाव, तालुका, शहर जिल्हा पातळीवरील संघटना या राज्य शिखर संघटनेशी संलग्न असाव्यात, त्यात गटतट नसावेत. शिखर नेतृत्व मान्य करून त्यांच्या संलग्नतेत राहुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसाधारण उद्दिष्टा नुसार काम करायची तयारी असावयास पाहिजे. तसेच सर्व राज्यातील मंडळे राष्ट्रीय स्तरावरील एकाच शिखर संघटनेशी संलग्न असावयास हवेत. असा प्रयत्न कै ना. भु. संगमवार व श्री पुखराजजी राठोड यांनी केला होता त्याचे पुनरुज्जीवन होणे राष्ट्रीय स्तरावरील प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक आहे. म्हणजे इतरांवर सरकारवर आपण दबाव टाकू शकतो. केशकला शिल्पी बोर्डाची स्थापना करणे, कलम ३४० नुसार सरकारला ओबीसी साठी विविध कल्याणकारी योजना आखावयास लावून त्याची परिणामकारक अंमलबजावणी करणे या गोष्टी प्रभावी राजकीय नेतृत्वाने शक्य होतील. जातीनिहाय जनगणना हा एक ज्वलंत विषय आहे तो तडीस जाई पर्यंत लावून धरला पाहिजे.
नियोजन कसे व किती कालावधी साठी असावे? वरील चर्चेतील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय मुद्दे लक्षात घेऊन उद्दिष्टे ठरवावी लागतील व त्याप्रमाणे कमीतकमी पाच वर्षे व जास्तीत जास्त दहा वर्षांचे नियोजन प्रत्येक मुख्य उद्दिष्टासाठी करावे लागेल व प्रगतीचा आढावा दरवर्षी घ्यावा लागेल व योग्य ते बदल परिस्थितनुरूप करणे आवश्यक आहे. प्रत्येक उद्दिष्टासाठी एक समिती असावी त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या त्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करावा. आपल्या समाजाची अनेक मंडळे विविध उपक्रम हाती घेतात ते निश्चितच कौतुकास्पद आहेत. जसे सेना महाराजांची पुण्यतिथी, जयंती साजरी करणे, वधुवर मेळावे घेणे, मोफत वैद्यकीय सेवेसाठी शिबिरे घेणे इत्यादि. पण समाजातील तरूण मुलासाठी युवा सशक्तीकरण ( Youth Empowerment), महिला सशक्तीकरण (Women Empowerment) सारखी वैचारिक शिबिरे घेणे देखील काळाची गरज आहे. नोकरी विषयी मार्गदर्शन, दहावी बारावी नंतर निवडावयाचे विषय वा कोर्सेस याबद्दल मार्गदर्शन गरजेचे आहे.
मुलामुलींचा कल महत्वाचा आहे आईवडिलांची इच्छा मुलांवर लादणे अयोग्य होय. अपयश आले तर आयुष्यभराचे नुकसान होते व पर्यायी शिक्षण घेऊन नोकरी मिळवून आयुष्यात स्थिरावणे अत्यंत अवघड होते.
वरील सर्व मुद्द्यांचा परामर्ष या माझ्या विचारा द्वारे घेण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यातून नाभिक समाजाचे परिवर्तन होण्यास प्रेरणा व दिशा मिळेल अशी आशा वाटते.

## संयुक्त किसान मोर्चाने साजरा केला काळा दिवस

# केंद्र आणि राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांचा निषेध






**गडचिरोली । प्रतिनिधी**

शेतकरी विरोधी तीन काळे कृषी कायदे रद्द करण्याच्या मागणीसाठी दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना समर्थन देण्यासाठी लखीमपूर खिरी येथे आयोजित आंदोलना दरम्यान तीन शेतकरी आणि एका पत्रकाराला आपल्या गाडीने चिरडून मारणाऱ्या अजयसिंग टोनी मिश्रा यांच्या मुलावर अजूनपर्यंत कोणतीही कारवाई झाली नसल्याने संयुक्त किसान मोर्चातर्फे स्थानिक गांधी चौकात तीव्र निदर्शने करण्यात आले.
यावेळी केंद्र आणि राज्य सरकारच्या विरोधात नारेबाजी करण्यात आली. मोदी सरकार मुर्दाबाद, शिंदे सरकार मुर्दाबाद, शेतकरी हत्यारा मंत्रीपुत्र आशिष मिश्रा याला अटक करा, केंद्रीय गृहमंत्री अजयसिंग मिश्रा यांना पदावरून दूर करा, अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून सोडला.यादरम्यान कॉ. महेश कोपूलवार, रोहिदास राऊत, भाई रामदास जराते, कॉ. देवराव चवळे, राज बन्सोड, कॉ. अमोल मारकवार यांनी मार्गदर्शन केले. निषेध निदर्शने कार्यक्रमानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत राष्ट्रपतींना विविध मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले. केंद्र सरकारने तीन काळे कायदे आणले ते परत घ्यावे व शेतकऱ्याला शेतकऱ्यांच्या शेतीमालाला दीडपट हमीभाव द्यावा, केंद्र सरकारने आणलेला वीज बिल विधेयक परत घ्यावा , शेतीसाठी लागणाऱ्या वस्तू वर आकारण्यात येणारा १८ टक्के जीएसटी रद्द करावा, शेतकरी, शेतमजूर यांना वयाच्या साठ वर्षानंतर ५ हजार रुपये पेन्शन मिळण्याचा कायदा करावा या मागण्याही करण्यात या निवेदनात करण्यात आल्या.निषेध आंदोलना वेळी प्रा. प्रकाश दुधे, भाई शामसुंदर उराडे, रोहिदास कुमरे, जयश्रीताई वेळदा, हंसराज उंदीरवाडे, भाई अक्षय कोसनकर, प्रतिक डांगे, केशवराव सामृतवार, अशोक खोब्रागडे प्रकाश खोब्रागडे, नरेंद्र रायपुरे, संजय वाकडे, केवळराम नागोसे, सचिन जंबेवार, सुजित आखाडे, निता सहारे, विजय देवतळे, तुळशीदास भैसारे, देवेंद्र भोयर, विश्वनाथ म्हशाखेत्री, रेवनाथ मेश्राम, अशोक किरंगे, भास्कर ठाकरे, राजकुमार प्रधान, विनोद गेडाम, उमाजी मुनघाटे, ज्योती उंदीरवाडे, सुरेश फुकटे, हरिदास सिडाम, महेंद्र जराते, आकाश आत्राम, विनोद उराडे यांचे सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते

## भाजपची ओबीसी जागर यात्रा ४ ऑक्टोबरला जिल्ह्यात

# ओबीसींसाठीच्या सरकारी योजनांचा होणार जागर

**गडचिरोली । प्रतिनिधी**


एकीकडे मराठा, ओबीसी, धनगर आरक्षणाचे वातावरण पेटले असताना आता भाजपने ओबीसी समाजावर लक्ष केंद्रीत केले आहे. राज्यात चार टप्प्यांमध्ये ओबीसी जागर यात्रा काढल्या जाणार असून त्यातील पहिला टप्पा विदर्भात होणार आहे. सोमवारी (दि. २) वर्धा जिल्ह्यातील नगाजी महाराज देवस्थानातून प्रारंभ झालेली ही यात्रा बुधवार, ४ ऑक्टोबरला गडचिरोलीत येणार असल्याची माहिती खासदार अशोक नेते यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली.
भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात निघणाऱ्या या यात्रेचे नेतृत्व माजी आमदार डॉ. आशिष देशमुख आणि भाजप ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष संजय गाथे करणार आहेत. यात्रेचा समारोप वाशिम जिल्ह्यातील श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे विदर्भातील सर्व खासदार-आमदारांच्या उपस्थितीत होणार आहे.गडचिरोलीत सकाळी या यात्रेच्या माध्यमातून शहराच्या काही भागात 'घर चलो अभियान राबविले जाणार आहे. ही यात्रा



चंद्रपूर मार्गाने इंदिरा गांधी चौकातून आरमोरी मार्गावरील सभागृहात ओबीसी जागर मेळाव्यात रुपांतरित होणार असल्याचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे यांनी सांगितले.यावेळी विश्वकर्मा योजनेबद्दलही माहिती सांगण्यात आली. पत्रपरिषदेला आ. डॉ. देवराव होळी, लोकसभा समन्वयक तथा जिल्हा महामंत्री प्रमोद पिपरे, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अनिल पोहनकर, महिला प्रदेश सचिव रेखा डोळ, जिल्हा महामंत्री माजी नगराध्यक्ष योगिता पिपरे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# ‘रे मना’

प्रा.प्रज्ञा पंडित
तेजस्वी महाराष्ट्र ग्रंथ वितरण संस्था,ठाणे




आयुष्य सर्वच स्तरावर गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मक झाले आहे. ताण तणाव पदोपदी आणि क्षणोक्षणी आहे. महत्त्वाचे म्हणजे ही बाब सर्वच वयोगटात लागू होत आहे. शाळकरी, महाविद्यालयीन विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, गृहिणी, ज्येष्ठ नागरिक सर्वानाच या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. आधुनिक जगात जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले आहे. आजच्या या युगात व्यक्तीला आपल्या गरजा पूर्ण करत असताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, अशा वेळी जी गोष्ट आपल्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकते ते म्हणजे समुपदेशन होय.समुपदेशन हा मार्गदर्शन प्रक्रियेचा एक महत्वाचा भाग समजला जातो. ही एक अर्वाचीन संकल्पना आहे ज्याला सहमंत्रणा असे देखील म्हटले जाते. समुपदेशनादरम्यान व्यावसायिक , वैयक्तिक अशा कोणत्याही स्तरावरील समस्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. आजच्या काळात समाजात ' समुपदेशकांचा सल्ला घ्या ' हे अगदी सहजपणे सुचवले जाते आणि तितक्याच सहजपणे ते अमलात देखील आणले जाते. समुपदेशकांची प्रत्यक्ष भेट घेण्याआधी किंवा समुपदेशनाबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी या विषयावरील पुस्तके वाचण्याकडे वाचकांचा कल असल्याचे दिसून येते. त्यामुळे कथा, कादंबरी, ललित लेख, प्रवास वर्णन यासारख्या प्रचलित पर्यायांमध्येच समुपदेशन हा एक नवा साहित्य प्रवाह रुजू होत असल्याचे सकारात्मक चित्र पाहायला मिळते. ह्याच विषयावर आधारित असलेले शारदा प्रकाशन तर्फे प्रकाशित लेखिका आणि जोशी बेडेकर महाविद्यालय प्राचार्या डॉ. सुचित्रा आशिष नाईक लिखित ' रे मना ' हे पुस्तक नुकतेच वाचकांच्या भेटीला रुजू झाले आहे. लेखक प्रवीण टोकेकर यांची ' मन की बात ' या लक्षवेधी शीर्षकासह परिपूर्ण प्रस्तावना ' रे मना ' या पुस्तकाला लाभली आहे.मुखपृष्ठकार सतीश खोत यांनी तरल रंगात रेखाटलेले पुस्तकाचे मुखपृष्ठ अतिशय मनोवेधस आहे.लेखिका स्वतः ठाण्याच्या प्रख्यात जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयात प्राचार्या हा पदभार यशस्वीपणे सांभाळत आहेत. विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या त्यांनी घडवल्या. आधुनिकीकरण जसे इतर क्षेत्रात झाले तसे ते शैक्षणिक क्षेत्रात देखील झपाट्याने झाले. या दरम्यान विद्यार्थी, त्यांचे स्वभाव, त्यांच्या गरजा, त्यांच्या समस्या आणि त्यांच्या अपेक्षाही बदलत गेल्या. हे सर्व बदल वेळोवेळी समजून घेऊन, त्यानुसार शैक्षणिक आणि अध्यापन प्रणालीत योग्य ते बदल घडवत, मुख्य म्हणजे स्वतःलाही त्या बदलांमध्ये सामावून घेत समुपदेशनाचे कार्य लेखिका डॉ. नाईक मॅडम अव्याहतपणे करत आहेत. आपला पदभार सांभाळत शैक्षणिक, व्यावसायिक जबाबदारी सांभाळत सातत्याने सुरू असलेल्या समुपदेशन कार्यातील त्यांच्या अमूल्य आणि प्रदीर्घ अनुभवांचा ठेवा समाजातील सर्व घटकांना आणि अर्थातच येणाऱ्या नवीन पिढीला झाला तर अनेकांच्या मानसिक, सामाजिक, कौटुंबिक, वैयक्तिक समस्यांवर मात करण्यासाठी मार्गदर्शनपर ठरणार आहे.आणि म्हणूनच, लेखिका डॉ. नाईक यांनी आपल्या या सर्व प्रगल्भ अनुभवांमधील एक शिदोरी ' रे मना ' या लेख संग्रहाद्वारे वाचकांसाठी प्रकाशित केली आहे. पुस्तकाचे शीर्षकच लक्षवेधी आहे. ' रे मना ' - (तंत्र आणि मंत्र). समुपदेशनाद्वारे अधिक सक्षम बनता येते आणि सक्षमतेने आयुष्य जगणे हाच जगण्याचा मंत्र आहे हे लेखिका येथे सांगू इच्छित असल्याचे निदर्शनास येते. पुस्तकाच्या अंतरंगात लेखिकेला समुपदेशन कार्यात भेटलेल्या व्यक्ती आणि वल्ली यांचे अनुभव वाचायला मिळतात. त्याच बरोबर वाचनीय अशा झेनकथा आहेत. काही वाचकांना प्रश्न पडेल झेन कथा म्हणजे काय? तर झेन कथा म्हणजे जपानी संस्कृतीतील बोधपर तरल कथा! पुस्तकातील झेन कथा वाचता वाचता बरेचदा आपल्याही मनातील काही प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळत जातात. कोणतीही समस्या अस्तित्वात येण्यामागे त्याची काही कारणमीमांसा असते, मर्म असते. पुस्तकातील कथा जेव्हा आपण वाचतो तेव्हा या सर्वाचा उलगडा कसा होऊ शकतो हे समजत जाते.पुस्तकाच्या सुरुवातीच्या लेखात वाचकांना एक शब्द नक्की भावेल तो म्हणजे ' शुभार्थी '! ज्या व्यक्तीचे समुपदेशन करावयाचे आहे त्या व्यक्तीला संबोधून लेखिकेने ' शुभार्थी ' ही संज्ञा वापरली आहे.पुस्तकात समुपदेशनाचे अनुभव अंतर्भूत करताना लेखिका म्हणतात, 'हे अनुभव आणि त्यावर केलेले समुपदेशन हे सर्वकालिक उपाय असल्याचा दावा हे पुस्तक करत नसले , तरी ते शास्त्रीय विद्याशाखांचा, विचार प्रणालीचा आणि सांस्कृतिक संचितांच्या भक्कम आधाराद्वारे त्या त्या वेळी, त्या त्या व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्ट्य अनुसार, त्याच्या कौटुंबिक, सामाजिक परिस्थिती अनुसार केलेले समुपदेशन आहे. ' जगण्याच्या उंबरठ्यावर ' या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात रोहित आणि स्नेहा नामक दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या समस्येची दोन प्रातिनिधिक उदाहरणे वाचायला मिळतात. समुपदेशनात या केसेस कशा हाताळल्या जातात ते वाचायला मिळते. वाचतानाच आपल्याही आजूबाजूला असलेले असे अनेक रोहित, स्नेहा आपल्या नजरेसमोर येतात.त्या पुढच्याच ' बॅकस्टेज ' या लेखात दीपाली या महाविद्यालयीन तरुणीची आयुष्याच्या प्रवासात अनवधानाने झालेली ससेहोलपट समुपदेशकांच्या नजरेतून वाचायला मिळते.पुस्तकातील ' वळणावरचा प्रवास ', ' माता न तू वैरिणी' ' फिरता रंगमंच ' असे यापुढचे सर्वच लेख वाचकाला मनोमन कधी स्तब्ध करणारे, कधी विचार करायला लावणारे, कधी आत्म मग्न करणारे आहेत.शाळा कॉलेज मध्ये असताना आपल्याला ' गाईड ' नामक पुस्तक नेहमी हवे असते. ज्यात धड्यातील सर्वच प्रश्नांची यथासांग उत्तरे असतात. ' रे मना ' हे पुस्तक माझ्या मते आपल्या आयुष्यासाठी असणारे ' गाईड ' आहे. ज्यात कधी आपल्या, कधी आपल्या मुलांच्या, कधी भावंडांच्या तर कधी घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या वागण्याची उत्तरे मिळतील, त्यांच्या समस्या कळतील.तर, डॉ. प्रा.संतोष राणे यांच्या शारदा प्रकाशन तर्फे प्रकाशित, लेखिका प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक लिखित ' रे मना ' या पुस्तकाची पहिली आवृत्ती सर्व ऑनलाइन पुस्तक विक्री मंचावर सुरू आहे तसेच महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध आहे.थोडक्यात मी ही तुम्हाला पुस्तक ओळख करून दिली आहे, ही वाचल्यावर ' पुस्तक नक्की विकत घेऊन वाचा ' हे वेगळं आवाहन न करताच मला खात्री आहे की आपण वाचक उत्सुकतेने हे पुस्तक नक्की विकत घ्याल आणि तुमच्या संग्रही निरंतर ठेवाल! लेखिका महोदयांना,प्रकाशकांना तुमची प्रतिक्रिया , अभिप्राय नक्की कळवा. पुस्तक उपलब्ध न झाल्यास तसेच अधिकची मागणी नोंदवण्यासाठी जरूर संपर्क करा.

# जिल्हा कारागृहात विधी जनजागृती कार्यक्रम



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई आणि प्रमुख जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी भीष्म यांच्या निर्देशानुसार तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश सुमित जोशी यांच्या मार्गदर्शनात जिल्हा कारागृहात विधी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा कारागृह,चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य न्यायदंडाधिकारी प्रशांत कुलकर्णी यांच्यासह मंचावर जिल्हा कारागृह अधीक्षक अनुपकुमार कुमरे, मुख्य लोक अभिरक्षक ॲड. विनोद बोरसे, सहाय्यक लोक अभिरक्षक ॲड. फलके, ॲड. मोहरकर आदींची उपस्थिती होती.मार्गदर्शन करतांना मुख्य न्यायदंडाधिकारी प्रशांत कुलकर्णी म्हणाले, गुन्हा म्हणजे माणसाच्या मनात त्यावेळी सुचलेल्या दुर्बुद्धीतून झालेले कृत्य होय. एखाद्या व्यक्तीला आपले अधिकार कायदेशीर पद्धतीने न मिळाल्यास तो व्यक्ती बेकायदेशीर बाबींचा अवलंब करत असतो. येथील उपस्थित कैद्यांनी काहीतरी बेकायदेशीर कृत्य केल्यामुळेच ते तुरुंगात आहेत. तुमच्या खटल्या संदर्भातील संपूर्ण माहिती व कागदपत्रे वकिलांकडे द्यावे. जेणेकरून, वकील खटला प्रभावीपणे लढू शकतील. कारागृहात होणाऱ्या कार्यक्रमातून चांगले ज्ञान घेऊन संकल्प करावे, चांगले वर्तन ठेवल्यास कुटुंबासोबत राहण्यासाठी लवकरच जाता येईल, पुन्हा समाजात गेल्यानंतर चांगले व्यक्ती बनून राहावे असे मार्गदर्शन त्यांनी केले.जिल्हा कारागृह अधिक्षक अनुपकुमार कुमरे यांनी यावेळी उपस्थित न्यायबंद्याना शासकीय योजनांची व कारागृहाकडील उपक्रमांची माहिती दिली. ड. विनोद बोरसे यांनी जामीनविषयक कायदेशीर तरतुदी या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतीय संविधानाने अनुच्छेद कलम २१ नुसार प्रत्येकाला आपले जीवन सन्मानाने जगण्याचा हक्क बहाल केला आहे. त्यामुळे कारागृहातील न्यायबंद्याना देखील त्यांचे हक्क व अधिकार आहेत. जामीन म्हणजे आरोपीला तात्पुरते सोडणे होय. आरोपीला संबंधित यंत्रणेकडे अथवा न्यायालयाकडे कायदेशीर तरतुदीच्या आधारे जामीन अर्ज दाखल करावा लागतो. जामिनाचा अर्ज मंजूर झाल्यानंतर आरोपीला संबंधित न्यायालयात रोख रक्कम जमा करून अथवा लायक जामीनदार हजर करून योग्य त्या रकमेचा बाँड लिहून जामिनावर सुटता येते, असे त्यांनी सांगितले.त्यासोबतच, सहाय्यक लोक अभिरक्षक ॲड. फलके यांनी प्ली-बार्गेनिंग या विषयावर तर सहाय्यक लोक अभिरक्षक ॲड.मोहरकर यांनी न्यायबंदीवानाचे अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन संजीव हटवादे यांनी केले. यावेळी वरीष्ठ तुरुगांधिकारी संजय सोनवणे, प्रकाश लोमटे, ज्योती आठवले आदी उपस्थित होते.

# अभाविप च्या राष्ट्रीय कलामंच द्वारे प्रतिभासंगम विद्यार्थी साहित्य संमेलनाचे पोस्टर विमोचन



**वर्धा । प्रतिनिधी**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या साहित्य रचनेला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या राष्ट्रीय कलामंच अंतर्गत प्रतिभासंगम राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलनाचे आयोजन केल्या गेले आहे. यंदाच्या २०व्या प्रतिभासंगम च्या पोस्टर चे विमोचन अभाविप विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष डॉ. राजेश लेहकपुरे व प्रतिभासंगम चे निमंत्रक दुर्गेश साठवणे त्याचप्रमाणे राष्ट्रीय कलामंचच्या प्रदेश संयोजक स्वरश्री केतकर यांच्या हस्ते वर्धा येथे करण्यात आले.

कलयावेळी मंचावर अभाविप हिंदी विवि अध्यक्ष देवेश दुबे ,हिंदी विवि मंत्री अभिषेक द्विवेदी ,हिंदी विवि शाखेचे राष्ट्रीय कलामंच संयोजक मनीष तिवारी सुद्धा उपस्थित होते. येत्या ४ ,५ नोव्हेंबर २०२३ ला सोलापूर येथे या राज्य स्तरीय विद्यार्थी संमेलनाचे आयोजन होत असून या साहित्य संमेलनात स्वरचित कविता , कवितवाचन , कथा लेखन , स्वलिखित अनुदिनी , ललित लेख , संहिता लेखन ,पथनाट्य तसेच वैचारिक लेख इत्यादी प्रकारचे इंग्रजी ,मराठी ,हिंदी या भाषांमधील साहित्य राहणार असल्याची माहिती राष्ट्रीय कलामंच प्रदेश संयोजक स्वरश्री केतकर यांनी दिली. गेल्या २० वर्षांपासून प्रतिभासंगम या विद्यार्थी साहित्य संमेलनाचे आयोजन केल्या जाते. महाविद्यालयातील विद्यार्थी साहित्यकारांसाठी ही सुवर्ण संधी व मोठे व्यासपीठ असल्याने यामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन संमेलनाचे निमंत्रक व अभाविप विदर्भ प्रदेशाचे समाजकार्य विद्यार्थी कार्य प्रमुख दुर्गेश साठवणे यांनी केले.

# मिशन शक्ती' योजनेअंतर्गत गरजू महिलांकरीता महिला सक्षमीकरण केंद्र

## जिल्ह्यातील महिलांना लाभ घेण्याचे आवाहन




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महिलांची सुरक्षा, संरक्षण आणि सक्षमीकरणासाठी 'मिशन शक्ती' या एकछत्री योजनेअंतर्गत महिला सक्षमीकरण केंद्र ही घटक योजना केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालय आणि महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एकत्रितरीत्या राबविण्यात येत आहे.

या योजनेची जिल्हास्तरावर संपूर्ण अंमलबजावणी जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा महिला व बालविकास विभाग अधिकारी कार्यालय,चंद्रपूर यांच्याअंतर्गत करण्यात येते. महिला सक्षमीकरण केंद्र जिल्ह्यातील सखी वन स्टॉप सेंटर, स्त्री आधार केंद्र, कृष्ण नगर चौक, मुल रोड, चंद्रपूर येथे तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्यात आले आहे.या योजनेअंतर्गत जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील प्रवेशित गरजू लाभार्थींना/महिलांना आरोग्य सेवा, उच्चप्रतीचे शिक्षण, व्यावसायिक कारकीर्द, व्यावसायिक समुपदेशन, वित्तीय नियोजन, उद्योजकता बॅकवर्ड व फॉरवर्ड लिंकेजेस, कामगार वर्गाचे आरोग्य व सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता आणि डिजिटल साक्षरता आदी क्षेत्रात योजनाबद्ध पद्धतीने सक्षम तसेच विकास करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येते. तसेच शासकीय कार्यक्रमात नाव नोंदणी करणे तसेच महिलांना त्यांची ओळख निर्माण करण्यासाठी दारिद्र्य रेषेखालील सर्वेक्षण, आधार, मनरेगा नावनोंदणी आदी कागदपत्रे तयार करण्यास मदत करण्यात येते. केंद्रामध्ये येणाऱ्या प्रवेशित लाभार्थ्यांच्या सुविधेसाठी सद्यस्थितीत वन स्टॉप सेंटर येथील केंद्र प्रशासक यांच्या उपस्थितीत कामकाज सुरू आहे. सर्व सामाजिक कार्यकर्ते, शासकीय व अशासकीय संस्था यांनी शासनाच्या या योजनेची माहिती चंद्रपूर शहर, तालुका व गावपातळीवर सर्व गरजू महिलापर्यंत पोहोचविण्याचा मानस आहे. सर्व गरजू महिलांनी वन स्टॉप सेंटरच्या केंद्र प्रशासक (प्रभारी) यांच्याशी ७४९८९३२६७३ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा सखी वन स्टॉप सेंटर, स्त्री-आधार केंद्र, कृष्ण नगर चौक, मुल रोड, चंद्रपूर या ठिकाणी प्रत्यक्षरीत्या भेट देऊन जास्तीत जास्त महिलांनी महिला सक्षमीकरण केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांनी केले आहे.

# भाजपाची ओबीसी जागर यात्रा ०५ ऑक्टोबरला चंद्रपूरात बाईक रॅली व भाजपा ओबीसी मेळाव्याचे भव्य आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात ''ओबीसी जागर यात्रा'' म. गांधी यांच्या जयंतीदिनी दि. ०२ ऑक्टोबर २०२३ पासून प्रारंभ झाली असून ही यात्रा चंद्रपूर महानगरात दि ०५ ऑक्टोबर ला पोहचत आहे. या यात्रेचे नेतृत्व ओबीसी मोर्चाचे प्रदेश प्रभारी डॉ आशिष देशमुख व भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते करीत असून या जागर यात्रेत ओबीसी मोर्चाचे प्रमुख पदाधिकारी सर्वश्री डी.डी. सोनटक्के, कमलाकर घटोड, रविंद्र चव्हाण, डॉ रविंद्र यनुरकर, विनोद तुरक, वैभव लाड, विनोद बेहरे, विजय वासेकर, सौ अर्चना डेहनकर, राजेंद्र डांगे आदि मान्यवर सहभागी असून या यात्रेचे चंद्रपूर आगमनाप्रसंगी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर, राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यपालन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील ओबीसी मोर्चाच्या व भाजपाच्या प्रमुख पदाधिकायांद्वारे स्थानिक विश्रामगृहात जंगी स्वागत करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नुकतीच अंमलात आणलेली प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, वैद्यकीय शिक्षणामध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण, ओबीसी आयोगाला बहाल केलेला संवैधानिक दर्जा, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेली स्वाधार योजना व ओबीसी हिताच्या अनेक योजनांना घेवून ओबीसी बांधवांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने या भाजपा ओबीसी जागर यात्रेचा मुळ उद्देश आहे. भाजपा हाच ओबीसींचा उध्दार व रक्षणकर्ता असल्याने या जागर यात्रेत ओबीसी बांधवांनी मोठ्या संख्येनी सहभागी होवून आपल्या एकजूटीचा परीचय द्यावा असे आवाहन भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा व महानगर पदाधिकारी यांनी केले आहे.भाजपाची ही ओबीसी जागर यात्रा चंद्रपूरात पोहचल्यानंतर शहरातील विविध समाजातील मान्यवरांच्या भेटी घेवून प्रमुख पदाधिकारी त्यांचेशी केंद्र व राज्य सरकारच्या योजनांबाबत वार्तालाप करुन सदर जागर यात्रा वरोरा नाका येथील शासकीय विश्रामगृहातून बाईक रॅलीने सकाळी १०.३० वा आंबेडकर कॉलेज-संत कंवलराम चैक-जटपूरा गेट-प्रियदर्शनी चैक-बस स्टॅन्ड-तुकुम मार्गे-महेश भवन येथे विसर्जीत होवून सर्व मान्यवर नेते मंडळी व अतिथींचे प्रमुख उपस्थितीत दु. १२.०० वा होणाऱ्या ओबीसी जागर मेळाव्याला संबोधित करतील. या मेळाव्यास सर्वश्री विजय राऊत, हरीष शर्मा, खुशाल बोंडे, राहुल पावडे, देवराव भोंगळे , प्रमोद कडू, श्रीमती संध्याताई गुरनुले, अनिल फुलझेले, अंजली ताई घोटेकर, डॉ मंगेश गुलवाडे, रवी गुरनुले, अल्का आत्राम, रघुवीर अहीर, विशाल निंबाळकर, अविनाश पाल, विनोद शेरकी, प्रकाश बगमारे, विद्याताई देवाळकर, रत्नमाला भोयर, अहेतेशाम अली, अंकुश आगलावे, राजू घरोटे, सुभाष कासनगोट्टवार, शिलाताई चव्हाण, मायाताई उईके, शितल गुरनुले आदिंची उपस्थिती लाभणार आहे. तरी ओबीसी घटकातील सर्व बांधवांनी भाजपाच्या सर्व आघाड्यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या मेळाव्याला हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दिवाकर पुध्दटवार, रवी चहारे, वंदना संतोषवार, विठ्ठल डुकरे, दिनकर सोमलकर, रवी लोणकर, सचीन कोतपल्लीवार, संदीप आगलावे, शशीकांत मस्के, प्रदीप किरमे, शैलेश इंगोले, राम हरणे, मधुकर राऊत, शाम आदमने, मुग्धा खांडे, धनराज कोवे, धम्मप्रकाश भस्मे, अमिन शेख, रुद्रनारायण तिवारी, किरण बुटले, बंडू गहूकर, अरुणा चैधरी, शिला कन्नोजवार, सुदामा यादव, संजय मिसलवार, शाम बोबडे, सचिन संदुरकर, उत्कर्ष नागोसे, सुभाश ढवस आदिंनी केले आहे.

# कर्मचा-यांच्या कंत्राटी भरतीचा निर्णय तात्काळ रद्द करा-डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

कर्मचा-यांच्या कंत्राटी भरतीचा निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी विदर्भ प्रदेश अध्यक्ष केंद्रीय मानवाधिकार संगठन नवी दिल्लीचे डॉ. अंकुश आगलावे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाच्या माध्यमातुन केली आहे.

अधिकार्यासह कार्यालयातील सर्वच महत्त्वाची पदे आता कंत्राटी पध्दतीने भरणार आहेत. यासाठी सहा सप्टेंबर २०२३ रोजी नऊ कंपन्यांना ठेका देण्यात आला आहे. यातील काही कंपन्या राज्याबाहेरील आहेत. शासनाने घेतलेला निर्णय हा अत्यंत अयोग्य पध्दतीचा आहे. या निर्णयामुळे समाजातील मागासवर्गातील घटकांना न्याय न मिळण्याचे दिसून येत आहे. कंत्राटीपध्दतीने आरक्षणाला एक प्रकारची कात्री लागण्याचे स्पष्ट दिसून येत आहे. हा निर्णय समाजातील शिक्षित घटकांची पायमल्ली करणार आहे. मागील सहा वर्षापासून कंत्राटी पद्धतीने कामगार घेण्यात येत होते. दोन कंपन्याना हे काम देण्यात आले होते. शिपाई, सफाई कामगार अशा किरकोळ पदांचा यामध्ये समावेश होता. आता मात्र याची व्यापकता वाढवली आहे. यामध्ये अतिकुशल, कुशल, अर्धकुशल व अकुशल कर्मचार्यांची भरती होणार आहे. प्रत्येक पदाचा पगार निश्चित करण्यात आला आहे.



यासाठी नऊ कंपन्यांनी अधिकार देण्यात आले आहेत. हा निर्णय शासनाचा अत्यंत अयोग्य आहे. सर्व सरकारी कार्यालयात आता खासगी कंपन्यांनी नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी काम करणार आहेत. हे अधिकारी नियुक्त करण्याचे सर्व अधिकार कंपन्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे कंपन्यांची हुकूमशाह चालणार आहे. त्यांचा पगार निश्चित करण्यात आला असून तो सरकार देणार आहे. त्यातील पंधरा टक्के कमिशन कंपन्यांना मिळणार आहे. सर्व शासकीय, निमशासकीय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्व आस्थापना विभागात लागणारे कर्मचारी याच कंपन्याकडून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. दीडशेपेक्षा अधिक प्रकारची पदे निश्चित केले असून यानुसार हजारो कर्मचार्यांची भरती होईल. यामध्ये इंजिनिअर, व्यवस्थापक, संशोधक, अधीक्षक, प्रकल्प समन्वयक, सल्लागार, ग्रंथपाल अशा अनेक प्रकारची पदे आहेत. त्यामुळे सरकारी कार्यालयात आता अधिकारी ते शिपायापर्यंत सर्वच कंत्राटी पदे असणार आहेत.सरकारी कर्मचार्यांची भरती करताना बहुजन समाजाला न्याय मिळावा म्हणून आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. पण कंत्राटी भरती करत आरक्षण मिळणारच नाही असे शासनाने स्पष्ट केले दिसून येते.

# आनंद निकेतन महाविद्यालयातील एन.सी.सी डिपार्टमेंट मार्फत स्वच्छता अभियान व रॅली

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन महाविद्याल वरोरा येथील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृनाल काळे व एन.सी.सी अधिकारी लेफ्टनंट संदीप पारखी यांच्या मार्गदर्शनामध्ये एन.सी.सी डिपार्टमेंटच्या वतीने २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.या मार्फत 'स्वच्छता ही सेवा' या अंतर्गत आनंदवन चौक , पोलिस चौकी, चौकातील बस स्टॅन्ड आजूबाजूचा परिसर या ठिकाणी एन .सी .सी कॅडेट द्वारे श्रमदान करून व स्वच्छता रॅली काढून अभियान राबविण्यात आले.

अभियानांतर्गत विविध नारे विद्यार्थ्यांना कडून देण्यात आले जसे की स्वच्छ गाव स्वच्छ शहर स्वच्छ देश ,प्लास्टिक हटाव देश बचाव . तसेच विद्यार्थ्यां मार्फत आजूबाजूची




आजूबाजूच्या परिसरातील लोकांना स्वच्छता विषय जाणीव निर्माण करून देण्यासाठी संदिप पारखी सर यांच्या मार्गदर्शनाखाली छोटी छोटी पथनाट्य सुद्धा विद्यार्थ्यांनी सादरीकरण केली व लोकांना मार्गदर्शन केले .

# राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी केली विद्यार्थ्यांना मदत

**सिरोंचा । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावरील सिरोंच्या येथील शासकीय आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्याची गरज होती.पण आर्थिक अडचणीमुळे तेथील विद्यार्थी चिंतेत होते. ही बाब सिरोंचा येथील जगदंबा फाऊंडेशनचे पदाधिकारी यांना कळताच त्यानी विद्यार्थ्यांची भेट घेतली व विद्यार्थ्यांची त्यांची समस्या जाणून घेतली.

जगदंबा फाऊंडेशन पदाधिकारी यांनी ही विद्यार्थ्यांनची समस्या माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या पर्यंत पोहचवली,तेव्हा आत्राम यांनी विद्यार्थ्यांची समस्या जाणून घेत, सिरोंच्या येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्याच्या माध्यमातून शासकीय आदिवासी वसतिगृहातील ३४ विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य देण्यात आले, त्यामध्ये, टी-शर्ट, व्हॉलीबॉल, नेट आणि इतर काही वस्तू वाटप केले, त्यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरीला आनंद पाहण्यासारखा होता.अहेरी इस्टेटचे राजे व माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम हे आपल्या अहेरी विधानसभा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नेहमी मदत करत असतात आणि क्रिडा क्षेत्रात जाऊन विद्यार्थी आपलं आयुष्य घडवतील यासाठी प्रेरणा देत असतात.यावेळी जगदंब फाउंडेशन सिरोंचा अध्यक्ष हरीश कोत्तावडला ,उपाध्यक्ष दिनेश सुनकरी, सचिव नागराजू मेडारपु, कोषाध्यक्ष शेखर मंबु,भाजप ज्येष्ठ नेते बापन्नाजी रंगूवार भाजपचे तालुकाध्यक्ष दिलीप सेनिगारपू, जिल्हा उपाध्यक्ष शंकर नरहरी, जिल्हा सचिव संदीप राचर्लावार,सितापती गट्टू ,मुरली मार्गोनी,रवींद्र आकुदरी, राजेश सुनकरी ,शिरीष बेहेरी, रोहन तोटा, रवी कुमार पेयाला हे उपस्थित होते.



# संजय गांधी निराधारांचे थकीत असलेला अनुदान तात्काळ मिळवून द्या-सागर मूलकला यांची मागणी

**सिरोंचा । प्रतिनिधी**

तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान मागील जून महिन्यापासून थकीत आहे,

ते अद्याप लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही करिता थकीत असलेले अनुदान तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष सागर मूलकला यांनी केली आहे, सिरोंचा तालुक्यातील लाभार्थ्यांच्या वतीने त्यांनी सिरोंचाचे तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविले. सिरोंचा तालुक्यात गोरगरीब, वृद्ध, अपंग, विधवा,अनाथ मुले /मुली ,दुर्धर आजार,असे निराधारांचे देय असलेलं संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान तात्काळ लाभार्थ्यांना देण्यात यावे,मागील जून महिन्यांपासून लाभार्थ्यांना अनुदान न मिळाल्याने लाभार्थ्यांच्या कुटुंबावर उपास मारीची पाळी आली आहे,सदर अनुदान हे एकूणच महाराष्ट्राच्या लाभार्थ्यांचे थकीत असल्याची माहिती आहे ,अशात महाराष्ट्रातील लक्षावधी लाभार्थ्यांना अद्यापही अनुदान मिळाले नसल्याचे सर्व लाभार्थ्यांची



गैरसोय होत असताना दिसून येत आहे, यावर शासनाने गंभीरतेने लक्ष घालून संजय गांधी निराधार योजनेचा लाभार्थ्यांना तात्काळ देय असलेली रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करण्यात यावी ,अशी मागणी शरद पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष अतुल गण्यारपवार ,तालुका अध्यक्ष फाजील पाशा यांच्या मार्गदर्शनाखाली सिरोंचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष सागर मूलकला, याचासह कार्यकर्त्यांनी तहसीलदार जितेंद्र सिकतोडे यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.सिरोंचाचे तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस - चोक्कामवार, तालुका उपाध्यक्ष - सागर मूलकला,राष्ट्रवादी कार्यकर्ते सडवली मेडीजेर्ला,विनोद नायडू,राजू मूलकला,अंकुलू मेडीजेर्ला यांच्यासह लाभार्थ्यांची उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालय धानोराला नऊ कोटी रुपये निधी मंजूर करून पन्नास खाटांचे भूमिपूजन खासदार अशोक नेते यांच्या हस्ते संपन्न

**धानोरा । प्रतिनिधी**

मान.पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या वाढदिवसापासून सेवा पंधरवाडा'अंतर्गत दररोज विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टी च्या वतीने आज धानोरा उपजिल्हा रुग्णालय येथे भव्य आरोग्य मेळावा व महा आरोग्य तपासणी शिबिर व आयुष्यमान भारत व आभा कार्डची नोंदणी व वितरण तसेच उप जिल्हा रुग्णालय धानोरा ला नऊ कोटी रुपये निधी मंजूर पन्नास खाटांचे भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी उदघाटन खासदार अशोक नेते यांच्या हस्ते तर माजी जिल्हाध्यक्ष तथा जेष्ठ नेते साईनाथ साळवे, महिला मोर्चा प्रदेश चिटणीस सौ.रेखाताई डोळस,भाजपा तालुकाध्यक्षा लता पुन्घाटे, कृ.ऊ.बा.स. सभापती शशिकांत साळवे,माजी सभापती अजमल रावते,माजी पं.स. उपसभापती अनुसया कोरेटी,तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. हिचामी, डॉ.राजेश गजबे,ता.महामंत्री





विजय कुमरे, देवराव मोगरकर,युवा मोर्चा चे सांरग साळवे, संजय कुंडु, साजन गुंडावार, राकेश दास, दिपेन सरकार,आसिफभाई,राकेश खरवडे,सुभाष धाईत,गणेश भुपतीवार, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.यावेळी खासदार अशोक नेते यांनी उद्धाटन प्रसंगी बोलतांना नागरिकांनी महा आरोग्य शिबिरात जावून आपल्या आरोग्याची तपासणी करा,व आपल्या आरोग्याची काळजी घ्या हा भाग अति दुर्गम भाग म्हणुन ओळखला जातो,याकरिता या भागात नागरिकांना आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आपण जिल्हा उप रुग्णालय धानोरा या ठिकाणी पन्नास खाटांचे नऊ कोटी रुपयांचा निधी माझ्या प्रयत्नाने मंजूर झाला.निश्चितच यांचा फायदा नागरिकांना होईलयांचा चांगला लाभ नागरिकांनी घ्यावा.असे प्रतिपादन याप्रसंगी खासदार अशोक नेते यांनी केले.यावेळी या भव्य आरोग्य मेळाव्याचा लाभ नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी व तपासणी करत आयुष्यमान भव: व आभा या कार्डाचा लाभ जास्तीत जास्त संख्येने घ्यावा असे आवाहन याप्रसंगी केले.या निमित्याने खासदार अशोक नेते,यांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून शुभारंभ केला.याप्रसंगी बहुसंख्य नागरिकांनी शुगर, बीपी, कॅन्सर,नेत्र तपासणी, मुख रोग तपासणी, हृदयरोग तपासणी, सिकलसेल ची आरोग्य तपासणी करून घेतली व आभा कार्डचा लाभ घेतला.आरोग्य कर्मचारीवृंद, आरोग्य सेविका, आशा सेविका,तसेच मोठ्या संख्येने धानोरा चे नागरिक उपस्थित होते.

# आनंदनिकेतन महाविद्यालयात गांधी जयंतीचा कार्यक्रम संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती च्या निमित्ताने दिनांक २ ऑक्टोबर २०२३ रोजी आनंदनिकेतन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने श्रमदान व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे यांनी या प्रसंगी स्वच्छतेचे व श्रमदाना चे महत्व उपस्थित सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना पटवून दिले.अशा जयंती च्या माध्यमातून महापुरुषांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा.राधा सवाने यांनी याप्रसंगी



विद्यार्थ्यांना अहिंसेचे महत्व व ताकद पटवून दिली. मनाची स्वच्छता महत्त्वाची म्हणजे आपोआपच देशाची स्वच्छता राखली जाईल असे मत त्यांनी याप्रसंगी मांडले व महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.'श्रम ही है श्रीराम हमारा' हे श्रद्धेय बाबा आमटे व आनंदवनाचे ब्रीद वाक्य आणि ह्याला अनुसरूनच आजच्या श्रमदानात अनेक विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रा.मारुती मुंडे यांनी केले.रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.मोक्षदा नाईक व प्रा.सुरेश राठोड आणि या कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात श्रमदान व स्वच्छता केली.

# सार्वजनिक गणेश मंडळांना पाचशेहून अधिक ग्रामगीता वितरीत – डॉ.अंकुश आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

भद्रावती व वरोरा शहरातील तसेच ग्रामीण भागातील सार्वजनिक गणेश मंडळांना पाचशेहून अधिक ग्रामगीता डॉ. अंकुश आगलावे, श्री. गुरूदेव प्रचारक, वरोरा यांनी वितरीत करून सार्वजनिक गणेश मंडळाचे पदाधिका-यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. आगलावे यांनी प्रसिध्दी पत्रकास सांगितले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामशुध्दी, ग्रामनिर्माण, ग्रामरक्षण, ग्रामआरोग्य, ग्रामशिक्षण, ग्रामकुटूंब ,ग्रामप्रार्थना , ग्राममंदीर ग्रामसेवा, ग्रामसंस्कार, ग्रामउद्योग, ग्रामसंघअन ग्रामआचार या सर्वांचा सुक्ष्म विचार ग्रामगीतामध्ये केला आहे त्यामुळे सार्वजनिक मंडळाच्या माध्यमातुन ग्रामगीता समाजातील



शेवटच्या घटकापर्यंत पोहचवून त्याचा समाज उध्दारासाठी आत्मसात केला पाहिजे. जनसेवा हीच ईशसेवा मानणारे तुकडोजी महाराज हे समाजसुधारक संत आहे. त्यांच्या अंतरंगात वास करीत असलेली तळमळ ग्रामगीतेतून शब्दरूप होऊन बाहेर पडली आहे. भारतीय नवरचनेच्या संधिकाळात महाराजांनी ही ग्रामगीता जनतेच्या हाती देऊन ग्रामसुधारणेच्या कामाला सैद्धांतिक दिशा दिली आहे. यावेळी श्री. गुरूदेव प्रचारक, वरोरा व केंद्रीय मानवधिकार संगठनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

## ज्येष्ठ नागरिकांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता – छोटूभाई

**वरोरा । प्रतिनिधी**

स्थानीक कटारिया भवन, वरोरा येथे ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने १ ऑक्टोंबर ला 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष वि. गो. सोनेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून जैरुद्दीन शेख (उर्फ छोटूभाई) प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी काँग्रेस कामगार व कर्मचारी विभाग,संध्या चिवंडे, अधिक्षक अभियंता,म.रा.वि.वि.कं. चंद्रपूर,
वंदना बरडे, वैद्यकिय समुपदेशक, उपजिल्हा रुग्णालय, वरोरा, स्मिता सोनेकर,अर्चना लोडे, प्रिती कामडी (पोहाणे) हे उपस्थीत होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला जैरुद्दीन शेख (उर्फ छोटूभाई) व इतर पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम म्हणजे ९० पार केलेल्या ज्येष्ठतमांचा सन्मानपत्र, अहेर, पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. त्यांचे आत्मबल व



जगण्याची उमेद जागवून त्यांचे आशीर्वाद मिळविले. ७५ वर्षे पूर्ण केलेल्या संघसदस्यांचा अमृतमहोत्सवी सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याच कार्यक्रमात सासू सुनेचा संवाद' हा कौटुंबिक समस्येवर प्रकाश टाकणारा नाविन्यपूर्ण संवाद सादर करण्यात आला.प्राध्यापिका अर्चना लोडे, प्रिती कामडी (पोहाणे), स्मिता सोनेकर यांनी अभ्यासपूर्ण व प्रभावी सादरीकरण केले. प्रेक्षकांना हा कार्यक्रम खूप भावला व त्यांनी भरभरून कौतुक केले. कार्यकारीणी सदस्य डॉ. जवादे यांनी कविता सादर केल्या प्रमुख अतिथी छोटुभाई यांनी ज्येष्ठ नागरिक आमचे खरे मार्गदर्शक आहेत, त्यांचे अनुभव, ज्ञान व कौशल्य आमच्या प्रगतीसाठी पथदर्शक आहेत. त्यांचे आशीर्वाद व अनुभवाचे बोल सदैव आम्हाला लाभावेत अशी अपेक्षा दर्शविली.वैद्यकिय समुपदेशक वंदना बरडे यांनी आरोग्य रक्षणासाठी आवश्यक नियमांची शपथ दिली. साध्या सोप्या व्यायाम प्रकाराने निरोगी राहण्याच्या टिप्स सविस्तर सांगितल्या. अध्यक्षीय भाषणातून सोनेकर यांनी सांगितले की आपला ज्येष्ठ नागरिक संघ ज्येष्ठांच्या आनंदी व आरोग्यदायी दीर्घायुष्यासाठी कटिबद्ध आहे. त्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीरित्या केल्या जातात व पुढेही करीत राहू.कार्यक्रमाचे संचलन स. रा. माहुरे यांनी केले, गीतगायन शा.मा. धवने यांनी केले. आभारप्रदर्शन सहसचिव मीरा वानखेडे यांनी, प्रास्ताविक सचिव मा. कि. मगरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. ह्या आनंदाच्या सोहळ्याची सांगता स्नेहभोजनाने झाली. सर्वांच्या सहकार्याने सदर कार्यक्रम शांततेत पार पडला

# १८ व्या राज्यस्तरिय आष्टेडु आखाडा स्पर्धेत वरो–यातील विद्यार्थ्यांचे सुयश



**वरोरा । प्रतिनिधी**

३० सप्टेबर ते २ आक्टोबर २०२३ ला अमरावतीच्या डा. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात अमरावती जिल्हा आष्टेडु आखाडा असोसिएशन व डा बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उत्तम नगर अमरावतीच्या संयुक्त विद्यमाने १८ व्या राज्यस्तरीय आष्टेडु आखाडा स्पर्धा २०२३ चे आयोजन करण्यात आले होते . या स्पर्धेत वरो–याच्या फौजी वारिअर्स च्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश संपादन केलेले आहे . रीतिक धवने , सानिया आवारी , पियुष विंधाने , वेदिका भोयर , शंतनु ढवने , सोनू निखोडे , फकीरा निखाडे या सात विद्यार्थ्यांनी गोल्डमेडल तर पद्मश्री झुरळे व शोन दसूडे या दोघांनी सिल्व्हर तर वेदांत अतकळे याला ब्रांझ मेडल मिळालेले आहे . फौजी वारिअर्स मार्शल आर्टस् व आष्टेडु आखाडा स्पर्धेत सातत्याने वरो–याचे नाव केवळ राज्यातच नव्हे तर आंतरराष्ट्रिय स्पर्धेतही सातत्याने मोठं करत आहे . सदभावना चौकातील इंदीरा गांधी शाळेच्या आवारात हे सर्व विद्यार्थी गुरु राजु नकवे , प्रविण चिमुरकर , डी. ऐन. खापने , रवी चरुरकर व रविंद्र तुरानकर यांच्या मार्गदर्शनात कसून सराव करतात . या सर्व विद्यार्थ्यांवर वरोरावासियांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे .

## दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना सायकल वाटप

# पोलिस दादालोरा खिडकी उपक्रमाचा नागरिकांना होतोय लाभ ;गडचिरोली पोलिसांचा पुढाकार

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या पोलीस दादालोरा खिडकी चे माध्यमातुन, जिल्हयातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणुन ०१ ऑक्टोबर रोजी गडचिरोली पोलीस दल तसेच रोटरी क्लब, नागपूर साऊथ ईस्ट व माऊली सेवा मित्र मंडळ, नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने दुर्गम भागातील गरजू नागरिकांसाठी विविध 'साहित्य वाटप कार्यक्रम' पोलीस मुख्यालय येथील एकलव्य सभागृह येथे पार पडला.

यावेळी दुर्गम–अतिदुर्गम भागातील २०० विद्यार्थी– विद्यार्थीनी सहीत बचत गटातील महिला व नागरिक उपस्थित होते. यामध्ये ७५ विद्यार्थी–विद्यार्थीनींना सायकल, ७५ नागरिकांना स्मोकलेस चूला तसेच पुरुष व महिला बचत गटांना स्प्रे पंप व खताच्या बॅगेचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी–विद्यार्थीनी व नागरिकांना पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी गडचिरोली



जिल्हयातील जनतेनी आपली आर्थिक प्रगती करावी व विविध तंत्रज्ञानाचा वापर करुन आपली उन्नती साधावी आणि गडचिरोली पोलीस दलाच्या विविध उपक्रमाचा लाभ घेवून आपले जीवनमान उंचवावे असे आवाहन केले. यासोबतच महिलांना आता स्मोकलेस चूल्याच्या वापराने धुरामुळे होणारा त्रास कमी होईल. तसेच नक्षलवाद्यांच्या खोट्या चळवळीला बळी न पडता गडचिरोली पोलीस दलाच्या सहकार्याने जिल्हयाचा विकास साधावा व गडचिरोली जिल्हयातील जनतेच्या विकासासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल असे सांगितले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी–विद्यार्थीनींनी व बचत गटातील पुरुष व महिलांनी व इतर नागरिकांनी सायकल तसेच इतर विविध साहित्य मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करत गडचिरोली पोलीस दलाचे आभार मानले.यावेळी अपर पोलीस अधीक्षक (अभियान) अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता तसेच रोटरी क्लब, साऊथ ईस्ट नागपूरचे अध्यक्ष राजीव वरभे, माऊली सेवा मित्र मंडळ, नागपूरचे अध्यक्ष सुहास खरे व रोटरी क्लब, नागपूर साऊथ ईस्टच्या फर्स्ट लेडी स्मिता वरभे आदी उपस्थित होते.

# खा.अशोक नेते यांच्याकडून सावली तालुक्यातील मोहुर्ले व गूंडावार कुटुंबीयांची सांत्वना भेट

## सावली येथील गणेश विसर्जना दरम्यानची घटना

**सावली । प्रतिनिधी**

तालुक्यातील गणपती विसर्जना करिता गेलेल्या सावली तालुक्यातील तीन युवकांचा गोसीखुर्द च्या नहरात बुडून दुर्दैवी करून अंत झाला. या घटने संबंधित माहिती मिळताच खासदार अशोकजी नेते यांनी आज तात्काळ सावली तालुक्यातील चांदली बुज व सावली येथे जाऊन मृतकांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.यावेळी कुटुंबाला आर्थिक मदतही केली.

यात सावली येथील सचिन दिवाकर मोहुर्ले वय ३३ वर्ष तर सावली तालुक्यातील चांदली बुज येथील निकेश हरिभाऊ गुंडावार ३३ वर्ष व संजय हरिभाऊ गुंडावार वय ३१ वर्ष हे एकाच कुटुबांतील व्यक्तीयांचा समावेश होता. मृत्यू पावलेले तिन्ही युवक कुटुंबातील हे एकमेव कमावतेच व्यक्ती असल्याने अतिशय दुर्दैवी घटना घडली,खासदार अशोक नेते यांनी आपल्या दुःखद भावना व्यक्त करत मी आपल्या दुःखात सामील आहो.जे काही अडीअडचणी असेल मला कळवावे,व शासन स्तरावर पाठपुरावा करून लवकरात लवकर



मदत मिळवुन द्यावी,असे निर्देश तहसीलदार पाटील यांना खासदार अशोक नेते यांनी यावेळी दिले.याप्रसंगी प्रामुख्याने महामंत्री तथा नगरसेवक सतिश बोम्मावार, कोषाध्यक्ष अर्जुन भोयर, तहसिलदार परिक्षित पाटील, जेष्ठ नेते प्रकाश पा.गड्मवार, प्रकाश खजांजी, अशोक आकुलवार, शहराध्यक्ष आशिष कार्लेकर, चांदली बुजचे सरपंच विठ्ठल येगावार,भाजपा शाखा अध्यक्ष अनिल येनगंटीवार,युवा मोर्चा तालुकाध्यक्ष विनोद धोटे,गौरव संतोषवार,राकेश विरमलवार, हरिष जक्कुलवार,मनोज अब्रोजवार, तसेच भाजपा कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .